२०११-२०१२

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग



## ११ वा वार्षिक अहवाल

१ एप्रिल २०११ -३१ मार्च २०१२

# महाराष्ट्र राज्य
# मानवी हक्क आयोग

## ११ वा वार्षिक अहवाल
## (एप्रिल २०११ — मार्च २०१२)

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना ... ... ... ... ... | (तीन) |
| २ | परिचय ... ... ... ... ... | १ |
| ३ | आयोगाने हाताळलेली प्रकरणे ... ... ... ... ... | ३ |
| ४ | मानवी हक्क शिक्षण आणि जागरुकता ... ... ... ... | ९ |
| ५ | व्यवस्थापकीय आणि तर्कगणिती मदत ... ... ... ... | १२ |
| ६ | जोडपत्र-अ. ... ... ... ... ... | १३ |

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

९, हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनस (व्हीटी) समोर, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी : २२०३ ४२३३ • फॅक्स : २२०९ १८०४


## प्रस्तावना

मानवी हक्क ही अभिव्यक्ती जरी दुसऱ्या महायुद्धानंतर उदयास आली असली तरीही ती संकल्पना नैसर्गिक कायद्याच्या आधारावर नैसर्गिक हक्काच्या संकल्पनेइतकीच जुनी आहे. जेव्हापासून नागरी जीवनाची सुरुवात झाली त्यावेळी असे निदर्शनास आले आणि असे स्पष्ट करण्यात आले होते की, काही हक्क असे आहेत जसे व्यक्तीस्वातंत्र्याचा हक्क, मालमत्तेचा हक्क हे हक्क मानवी प्रधिकरणाकडून अस्तित्वात आणले होते आणि ते हक्क सर्व ठिकाणच्या कोणत्याही वयाच्या माणसांना लागू होते आणि त्या हक्काचे उल्लंघन करता येत नव्हते.

अभिव्यक्ती " मानव अधिकारा " मध्ये मानवी प्रतिष्ठेचा प्रत्येक पैलू व्यापलेला आहे. प्रतिष्ठेने जगण्याच्या हक्कामध्ये मानवी संस्कृतीची सर्व सूक्ष्मतम मूल्ये समाविष्ट आहेत. मानवी हक्कांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना थोर मानवी अस्तित्वाचा प्रत्येक पैलू नव्याने परिभाषित करण्यात आला आहे आणि मानवी परिवारामधील प्रत्येक सदस्य हा समान पातळीवर असल्याचे दर्शविण्याचे प्रयत्न होत आहेत. ध्येयासिद्धी जरी खूप दूर असली तरी मार्गदर्शीका मात्र स्पष्ट होताना दिसत आहे.

मानवी हक्क चळवळ हे दुरस्थ स्वप्न असेल आणि दुःखी काल्पनिक गोष्ट असेल जोपर्यंत ती उच्चभ्रु लोकांच्या नियंत्रणाखाली आहे. आपल्याकडे सामाजिक बांधिलकीची जाणीव असणे गरजेचे आहे. ती चळवळ पंचतारांकित संस्कृतीच्या बाहेर आली पाहिजे. ती चळवळ खालच्या स्तरापर्यंत पुढे नेली पाहिजे. आम्ही सामाजिक जबाबदाऱ्या स्वतःच्या खांद्यावर घेतल्या पाहिजेत. गरिबांची दुःख आपापसात वाटून घ्यायला हवीत.

" मानवी हक्कांची अभिव्यक्ती " याला एक विशाल गर्भितार्थ आहे आणि याचा अर्थ असा की, मानवाचे मूलभूत हक्क जे वंश, धर्म आणि राष्ट्रीयत्व जरी कोणतेही असले तरीही, मानवी विकास व मानवी स्वातंत्र्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक आहेत. म्हणूनच मानवी प्रतिष्ठेचा केवळ राष्ट्रीय पातळीवरच नाही तर आंतरराष्ट्रीय स्तरावरदेखील आदर करावयास हवा, ओळख असायला हवी.

मानवाधिकारा वरील जागतिक परिषद सन १९९३ मध्ये हिएन्ना येथे झाली. या परिषदेच्या जाहीरनाम्यामध्ये असे निवेदन करण्यात आले की, सर्व मानवाधिकार हे मानवी व्यक्तिमधील प्रतिष्ठा व मानवाच्या अंगभूत असलेल्या मूल्यामधूनच प्राप्त करून घेता येतात आणि मानवी व्यक्ति हा मानवाधिकार आणि मूलभूत स्वातंत्र्याचा केंद्रीय विषय आहे.

अशा प्रकारे, हे दृष्टिकोन समजून घेऊन, दिनांक २८ सप्टेंबर १९९३ रोजी भारताच्या राष्ट्रपतींनी एक अध्यादेश (वटहुकूम) जारी केला, ज्याद्वारे मानवाधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर राष्ट्रपतींच्या वरील अध्यादेशाच्या जागी दिनांक १८ डिसेंबर १९९३ रोजी लोकसभेत मानवाधिकार विधेयक पारित करण्यात आले. सदर विधेयकास ८ जानेवारी १९९४ रोजी राष्ट्रपतींची अनुमती मिळाली आणि ते भारतीय **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आले अशाप्रकारे, मानवाधिकार संरक्षण कायदा (१९९४ मधील १० वा) २८ सप्टेंबर १९९३ रोजी अंमलात आला.

आज रोजी आयोगात कार्यरत असलेले मा. अध्यक्ष आणि सदस्य यांनी सप्टेंबर २०१३ मध्ये कार्यभार स्विकारला, आतापर्यंत २००७-०८ ते २०१२-१३ पर्यंतचे वार्षिक अहवाल तयार करुन तत्कालीन सचिव श्री. मफीउल हूसेन यांनी सरकारकडे सादर केले नव्हते त्याची कारणे त्यांनाच माहिती असू शकतील. नवीन अध्यक्ष आल्यानंतर पूर्वीच्या वर्षाचे प्रलंबित असलेल्या वार्षिक अहवालाचे कार्य प्राधान्यक्रमाने घेवून ते सादर करण्यात येत आहे.

**श्री. भगवंतराव डी. मोरे,**

सदस्य.

**न्यायमूर्ती श्री. एस. आर. बन्नूरमठ,**

अध्यक्ष.

स्थळ : मुंबई,

## भाग-१
## परिचय

या कायद्याच्या प्रस्तावनेत हे स्पष्ट होते की, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना करण्यासाठी तसेच राज्यात असे आयोग आणि मानवाधिकाऱ्यांचे चांगल्याप्रकारे संरक्षण करण्यासाठी आयोग त्या संबंधित प्रकरणना मानवाधिकार कोर्ट स्थापन करण्यासाठी हा कायदा प्रदान करण्यात आलेला आहे.

### "मानवी अधिकार/हक्का" ची व्याख्या

या कायद्याच्या कलम २(ड) मध्ये मानवी हक्क या संज्ञेची अशी व्याख्या केली आहे की, हे जीवन, स्वातंत्र्य, समानता आणि प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा यासंबंधीचे अधिकार आहेत. सदरच्या अधिकारांची राज्य घटनेने हमी दिलेली आहे किंवा त्यांना आंतरराष्ट्रीय करारात समाविष्ट केलेले आहे आणि त्या हक्कांची अंमलबजावणी भारतातील न्यायालयामार्फत करता येते.

१.१. मानवी हक्क आयोग वैधानिक मंडळाच्या हेतू व उद्देश मानवी हक्क आयोगाचे संरक्षण करणे हा आहे. मानवाधिकार संरक्षण कायदा, १९९३ च्या तरतुदी अंतर्गत या आयोगाची स्थापना ६ मार्च २००१ रोजी झाली. या आयोगाचा पाया ऑक्टोबर, १९९१ मध्ये पॅरिस येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय संस्थाचे प्रतिनिधींच्या बैठकीत समाविष्ट केलेल्या पॅरिस तत्वांवर आधारित आहे. ज्यांना मानवी संयुक्त राष्ट्र आयोग यांनी ३ मार्च १९९२ आणि संयुक्त राष्ट्र सर्वसाधारण संसद यांनी २० डिसेंबर १९९३ रोजी पाठिंबा दिला.

१.२ आयोगाचा हा ११ वा अहवाल आहे. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचा हा अहवाल एप्रिल, २०११ ते मार्च, २०१२ या कालावधीतील आहे. आयोगाने हे कार्य २००१ मध्ये सुरू केले आणि तेव्हापासून स्वत: लोकांच्या मदतीला पुढे येऊन, आयोगाने ज्या लोकांच्या मानवी हक्काची सरकारी सेवाकांकडून उल्लंघन झाले आहे त्या प्रकरणात स्वयंखूद्द दखल घेत आहे तेव्हा पासून आयोग मानवी हक्काना पाठींबा देणे, संरक्षण देणे हे ध्येय साध्य करण्यासाठी कार्यरत आहे. मानवी हक्कांच्या उल्लंघनाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींचा तपास करणे, चौकशी करण, न्यायिक उपाय, यासाठी आवश्यक आणि पुरेसे अधिकार आयोगाला दिलेले आहेत.

१.३ आयोग, मानवी हक्क उल्लंघनाचे संरक्षण, उल्लंघनास प्रतिबंध, संरक्षण, प्रसार या तत्वांचे अनुसरून करतो. त्याबाबत आयोगाने एक समग्र दृष्टिकोन ठेवला आहे. आयोग, शासनाचे अधिकारी/लोकसेवक यांचेकडून मानवी हक्कांच्या होणाऱ्या उल्लंघनास प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करतो.

१.४ आयोग, लोक सेवकाकडून मानवी हक्कांचे होणाऱ्या उल्लंघनाच्या प्रकरणात त्याचे निराकरण करण्याकरता येणाऱ्या अडचणीत तक्रारदाराला मदत करतो.

१.५ आयोगाने मानवी हक्कांच्या संरक्षण, प्रसार, करण्यासाठी विविध कार्यक्रम हाती घेतले आहेत. आयोग गरजूंना न्याय देण्यासाठी कर्तव्याने बांधील आहे. आयोग लोकांप्रती त्याच्या जबाबदाऱ्या आणि लोकांच्या अपेक्षा विचारात घेऊन तो लोकांप्रती वचनबद्ध आहे. आयोग मानवी हक्कांच्या विविध उल्लंघना करीता पाऊले उचलण्याची खात्री देते. उदा. जसे, कोठडीतील अत्याचार, छळ, मृत्यू आणि बलात्कार. आयोग, अटक करण्यासाठी सुचविलेल्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होते किंवा नाही यासाठी कारागृहाला अचानक भेटी देऊन हे पाहण्यासाठी कारागृहात आयोग अचानक भेटी देते आणि तेथील कामकाज तपासतो आणि त्यांचे कामावर लक्ष ठेवतो. तसेच आयोग पोलीस कोठडीत केलेल्या सुधारणा आणि ज्या कैद्यांवर कोर्टात केस चालू आहे त्यांच्या खटल्यांची सुनावणी घेण्यात येत आहे किंवा कसे याची तपासणी करते.

१.६ आयोग आपल्या अधिकाराचा प्रभावीपणे उपयोग करुन किंवा अत्याचाररित किंवा त्याच्या वतीने दुसऱ्या व्यक्तीने जर आयोगासमोर याचिका दाखल केली तर एखाद्या मानव अधिकार उल्लंघनाबाबत कार्यसमोर चालू असलेल्या प्रकरणात त्या कोर्टाच्या परवानगीने हजर होऊन मध्यस्थी करू शकतो, कारागृहाला किंवा इतर संस्था ज्या सरकाराच्या नियंत्रणात आहेत जिथे लोकांना स्थानबद्ध केलेले आहे किंवा उपचार सुधारणा/संरक्षण करण्यासाठी त्यांचा तिथे त्यांच्या राहण्याची परिस्थिती यांचा अभ्यास करण्यासाठी भेट देवू शकतो आणि त्यांच्या मानव हक्कांबाबत, संरक्षणाबाबत उपलब्ध असलेले उपाय यावर शिफारशी देऊ शकतो आणि तसेच आयोग विविध घटकातील लोकांत मानवी हक्कांबाबत साक्षरता, प्रसार याबाबत प्रकाशन, माध्यमे, चर्चासत्रे व इतर उपलब्ध असलेले मार्ग याद्वारे जनमानसात जागरुकता निर्माण करु शकतो.

१.७ आयोगाकडे प्राप्त झालेल्या आणि हाताळलेल्या तक्रारीचे स्वरूप आणि संख्या पाहता असे स्पष्ट होते की आयोगाची व्याप्ती आणि आयोगच्या कामाची कार्यकक्षा अनेक पटीने वाढलेली आहे. आयोगाचे विविध उपक्रम, कामकाज आणि उपाययोजना यामुळे आयोगाकडे येणाऱ्या तक्रारदारांची संख्या वाढली आहे.

(शा.म.मु.) वाय २१८८—३ (१,०००—१२-२०१४)

१.८ आयोग खालील महत्वाच्या विभागामार्फत कार्य करतो—

- प्रशासकीय विभाग
- तपासणी विभाग
- संशोधन विभाग
- विधी विभाग
- खाते (अकाऊंट) विभाग

आयोगाकडे न्यायमूर्ती क्षितिज आर.व्यास, अध्यक्ष म्हणून दिनांक २२ फेब्रुवारी २०१२ पर्यंत कार्यरत होते. न्यायमूर्ती व्ही.जी. मुनशी यांनी आयोगाचे सदस्य म्हणून दिनांक १९ फेब्रुवारी २०१२ मध्ये त्यांच्या निवृत्ती पर्यंत कार्य केले. श्री. सिंगारवेल, सदस्य हे त्यांच्या सेवानिवृत्ती दिनांक २५ ऑक्टोबर २०११ पर्यंत कार्यरत होते. ही तक्रार-निवारण यंत्रणा दिनांक २२ फेब्रुवारी २०१२ नंतर कार्यरत नव्हती.

## भाग-२

### आयोगाने हाजाळलेली प्रकरणे.

२.१. आयोग कार्यालयात प्राप्त झालेल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रयत्नशील आहे. तसेच आयोग काही प्रकरणात स्वयंखुद्द देखील दखल घेतो आणी त्यावर कारवाई सुरू करतो.

**२.२. आयोगाने या वर्षात निकाल देण्यात आलेली प्रकरणे.—**

मानवी हक्क उल्लंघन प्रकरणामध्ये निकाल देऊन त्याच्या कार्यामध्ये प्रगती केली आहे. प्राप्त झालेल्या प्रकरणांवरुन हे स्पष्ट होते की, आयोगाने केलेल्या उपाय योजनांवर त्यांच्यात जागृती आणि दृढविश्वास आहे. महाराष्ट्र राज्यात काम करणाऱ्या सार्वजनिक सेवकांकडून मोठ्या प्रमाणावर हक्कांचे उल्लंघन झालेल्या विविध विषयांवरील प्रकरणे आयोगाकडे प्राप्त झाली आहेत.

**सांख्यिकी आकडेवारी.—**

चालू वर्षी म्हणजेच सन २०११-२०१२ या वर्षात आयोगाकडे ५,६१० नवीन प्रकरणे प्राप्त झाली. मागील दोन वर्षातील आणि चालू वर्षातील प्राप्त प्रकरणांचा आणि निकाली निघालेली प्रकरणे यांचा तुलनात्मक अभ्यास खाली दिला आहे.

| वर्ष | प्राप्त तक्रारींची संख्या | निकालात निघालेल्या तक्रारींची संख्या |
|---|---|---|
| २००९–२०१० | ६०३४ | ७२२४ (यात निकालात निघालेल्या आणि प्रलंबित प्रकरणे समावेश आहे) |
| २०१०–२०११ | ५६३४ | ५४९२ |
| २०११-२०१२ | ५६१० | ३७०७ |

वरील तक्त्यानुसार तक्रारींची संख्या २००९-२०१० च्या तुलनेने कमी आहे. सन २०१०-२०११ मधील प्रकरणांची संख्या आणि सन २०११-१२ या वर्षातील प्रकरणे तुलनेने जवळजवळ समान आहेत. मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या प्रमाणात मोठ्या संख्येने घट झाली आहे. यांचे कारण दिले जाऊ शकत नाही. कारण काहीही असो परंतु लोकांना किमान त्यांच्या नैसर्गिक अधिकारांची जाणीव तरी होत आहे आणि ही जाणीव झाल्यामुळे ते आपल्या हक्कांच्या उल्लंघनाविरुद्ध उपाय शोधत आहेत.

| वर्ष | प्रकरणे निकालित |
|---|---|
| २००९–२०१० | ४४९८ |
| २०१०–२०११ | ३९६६ |
| २०११–२०१२ | ३१८२ |

**तक्रारीचे स्वरुप.—**

आयोगाला प्राप्त झालेल्या ५६१० तक्रारींचा एक विश्लेशणात्मक अभ्यास करण्यात आला आणि त्याप्रमाणे त्या प्रकरणांची खालील प्रमाणे वर्गवारी केली आहे.

**महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग (कार्यपद्धती) विनियमन २०११ प्रमाणे दखल घेण्यात येणारी प्रकरणे.—**

(१) पोलीस दलाविरुद्ध तक्रारी.— या तक्रारी मुख्यतः पोलीस अधिकारी, आणि इतर कर्मचारी हे आपल्या नियुक्त्यांचा गैरवापर करतात, तक्रार नोंदणी करताना आलेले अपयश, प्रतिकार बेकायदेशीर अटकाव, कोठडीतील छळ इ. प्रकारच्या तक्रारींचा समावेश असतो. ............................ १६४६ प्रकरणे.

२. स्थानिक स्वराज्य संस्थच्या विरुद्ध तक्रारी :—या श्रेणींमध्ये ग्राम पंचायत, पंचायत समिती, जिल्हापरिषद, नगरपरिषद व महानगर-पालिका यांच्या विरुद्ध तक्रारींचा समावेश असतो........ ३५ प्रकरणे.

३. इतर सरकारी विभागांविरुद्ध तक्रारी.—जसे गृह विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, सार्वजनिक आरोग्य खाते विभाग, सामाजिक कल्याण विभाग यांच्या विरुद्ध तक्रारींचा समावेश असतो. ..................................................................१२०१ प्रकरणे.

४. जात / लिंग / धर्म इ. वर आधारित भेदभाव तक्रारी.— ०१ प्रकरणे

**महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग (कार्यपद्धती) विनियमन २०११ प्रमाणे आयोगाला सर्वसाधारणपणे दखल घेता न येणारी प्रकरणे.—**

(१) नोकरीतील घटनांच्या संदर्भातील तक्रारी ............... ३२७ प्रकरणे.

(२) जमीन वाद, मालमत्ता अधिकार, नागरी व कौटुंबिक प्रकरणे, खाजगी प्रकरणे या संदर्भातील तक्रारी .................... २३२७ प्रकरणे.

(३) बँके विरूद्धच्या तक्रारी ...................................... ६९ प्रकरणे.

(४) भ्रष्टाचारा विरूद्धच्या तक्रारी .............................०४ प्रकरणे.

प्राप्त माहितीच्या आधारे पोलीस दलाविरुद्ध जास्तीत जास्त तक्रारी प्राप्त झालेल्या दिसून येतात. सर्वोच्च न्यायालयाने डी. के. बसू विरूद्ध बंगाल राज्य या प्रकरणात मानवी हक्क उल्लंघनाबाबत दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांची योग्य अंमलबजवानी न झाल्यास गंभीर प्रकरणे उद्‌भवू शकतात.

**कोठडीतील मृत्यू प्रकरणे**.— सन २०११-२०१२ मध्ये कोठडीतील मृत्यूंची २३२ प्रकरणे राज्य अधिकाऱ्यांकडून आयोगाकडे नोंदविली होती. त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

१२ मृत्यू पोलीस कोठडीत, ६८ मृत्यू तुरूंगात, १ मृत्यू पोलीस चकमकीत, ६९ मृत्यू भीक्षेगृहात, ७० मृत्यू बाल सुधार गृहामधून, ७ मृत्यू महिला आश्रमामधून आणि ५ मृत्यू मानसिकदृष्टया अपुरी मुले.

१. **प्रकरणे क्रमांक** :—१/२०११-२०१२/१७५१

**तक्रारदाराचे नाव** :- (१) स्वयंखुद्द - एम एस एच आर सी

**प्रतिवाद्याची नावे** :- (१) अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
(२) पोलीस आयुक्त, मुंबई.

**आदेशाची तारीख** :- २ ऑक्टोबर २०१२

**गणसंख्या/उपस्थिती**- (१) न्यायमूर्ती क्षितिज व्यास. मा. अध्यक्ष
( २) न्यायमूर्ती व्ही. जी. मुन्शी मा. सदस्य

**तक्रारीचे स्वरूप.**—स्वयंखुद्द “ मुबई मिरर ” ह्या ७ मे २०११ च्या वृत्तपत्रातील बातमीची महाराष्ट्र राज्य मानव अधिकार आयोगाने स्वयंखुद्द दखल घेतली. बातमीत आर म्हणजे लुटारू असा अर्थ असून आर म्हणजे हक्क नाही. मुंबईच्या पोलिसांनी सर्व संशयित गुन्हेगारांना गुन्ह्याच्या आध्याक्षरांचे त्यांनी ज्या पद्धतीचा गुन्हा त्याच्यावर दाखल आहे तो ‘ टी ’ शर्ट त्यांना घालण्यासाठी ठरविले.

**आयोगाने केलेली कारवाई.**—संबंधित अधिकाऱ्यांना नोटीसा पाठवून त्यांचेकडून अहवाल मागवून घेतला. त्या अहवाला नुसार ‘ मुंबई मिरर ’ मध्ये प्रसिद्ध झालेली बातमी ही दिशाभूल करणारी होती, ती खरी नव्हती.

**आयोगाचा निर्णय.**—मानवी हक्क आयोगाने स्वयंखुद्द प्रकरणात, योग्य अधिकारान, योग्य कारवाईसाठी स्वयंखुद्द हस्तक्षेप केला मिडीयाने बातम्या प्रकाशित करताना जबाबदार व सावध असणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी खोटे लेख प्रकाशित करणे टाळावे.

**२. प्रकरण क्रमांक** :—एस. एम. २/२०११-१२/२५९१

**तक्रारदाराचे नाव.**— स्वयंखुद्द एम एस एच आर सी

**प्रतिवादीचे नाव.**— (१) आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
(२) प्राचार्य, बृहन्मुंबई महानगरपालिका शाळा, मोहीली गाव, अंधेरी (पूर्व), मुंबई.

**आदेशाचा तारीख.**— १२ डिसेबर २०११

**गणसंख्या** :—(१) न्यायमूर्ती क्षितिज आर - व्यास, मा. अध्यक्ष.
(२) न्यायमूर्ती व्ही. जी. मुन्शी, मा. सदस्य.

**तक्रारीचे स्वरूप.—** सदरच्या प्रकरणात मा. आयोगाने दिनांक २२ जुलै २०११ च्या 'मुंबई मिरर' या दैनिकात छापून आलेली बातमी बृहन्मुंबईच्या शाळेत वीज नाही, पाणी नाही या बातमीची स्वयंखुद्द दखल घेतली. त्याशाळेतील विद्यार्थ्यांनां शाळेच्या अधिकाऱ्यांनी वीज बिल न भरल्यामुळे अंधारात अभ्यास करावा लागत होता. पिण्याचे पाणीसुद्धा आरोग्याला योग्य नव्हते.

**आयोगाने केलेली कारवाई.—**सदरच्या प्रकरणात आयोगाकडून संबधित अधिकाऱ्यांना नोटिसा पाठवून त्यांना वरील संदर्भात त्यांचा अहवाल सादर करण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे मा. आयोगाने पाठविलेल्या नोटिसा त्यांना मिळाल्यानंतर त्यांनी सर्व बिले अदा केली आणि त्यामुळे विजेचा पुरवठा पूर्ववत करण्यात आला.

**३. प्रकरण क्रमांक.—** एस.एम. ३/२०११-१२

**तक्रारदाराचे नाव.—** स्वयंखुद एस. एच. आर. सी.

**प्रतिवादीचे नाव -** (१) प्राचार्य, अध्यक्ष - महसूल व वन विभाग

(२) वन विभाग प्रमुख - ठाणे (पू.)

(३) आणि वन विभाग प्रमुख - यवतमाळ

**आदेशाची दिनांक -** २० डिसेंबर २०११

**गणसंख्या.—** न्यायमूर्ती क्षितिज आर - व्यास, मा. अध्यक्ष.

न्यायमूर्ती व्ही. जी. मुन्शी. मा. सदस्य

**तक्रारीचे स्वरूप.—** सदरची तक्रार महाराष्ट्राच्या महसूल आणि वन विभागाच्या विरूद्ध तक्रार असून दिनांक ३० जुलै २०११ रोजीच्या शासकीय निर्णयानुसार वनरक्षक या पदासाठी नियुक्ती अशा पारिश्रमिक हानी होण्याचा प्रसंग ज्यामुळे एका तरुणाचा मृत्यु ओढावला. त्याबाबत 'मुंबई मिरर' दिनांक १३ सप्टेंबर २०११ रोजीचा तसेच्या 'मुंबई मिरर' या वृत्तपत्रात १४ सप्टेंबर २०११ या 'लोकमत' वृत्तपत्रमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमी पत्रावर आधारीत ती तक्रार होती.

**आयोगाने केलेली कारवाई.—** मा. आयोगाने वरील बातमी ची स्वयंखुद दखल घेवून प्रतिवादी वन विभाग यांच्याकडून अहवाल मागविला.

**निर्णय.—** मा. आयोगाने ठामपणे अशी शिफारस केली आहे की, वन खात्याने वनरक्षकांच्या चालण्याच्या चाचणी संदर्भातीलच्या दिनांक ३० जुलै २०११ रोजीचा शासन निर्णयाच्या पुनर्विलोकन करावे. मा. आयोगाने मयत बालाजी नरसिंगरा तिरमनवारच्या कायदेशीर वारसांना आणखी भरपाई देण्याची शिफारस केली नाही. कारण या पूर्वीच राज्य सरकारकडून भरपाई पोटी त्यांना रुपये २ लाख देण्यात आले होते. तथापि मा. आयोगाने त्या कायदेशीर वारसांना जास्त नुकसानभरपाई मागण्याच्या त्यांच्या हक्काबाबत कोणताही अटकाव केला नाही आणि नियुक्ती प्रकरणासंबंधीच्या या आदेशानंतर घेण्यात येणारा कोणताही निर्णया मा. आयोगासमोर ठेवण्यात येईल.

वन विभागाकडून त्याचे पालन केले गेले आणि त्याचा अहवाल आयोगाला प्राप्त झाला.

(४) **प्रकरण क्रमांक** : सीडी २३७/२००९-१०

**तक्रारदाराचे नाव** :

**प्रतिवादीचे नाव** : तुरूंगाधिकारी अधीक्षक येरवडा, पुणे.

**आदेश दिनांक** : ७ फेब्रुवारी २०१२.

**गणसंख्या** : न्यायमूर्ती श्री. क्षितिज आर. व्यास, माननीय अध्यक्ष.

**तक्रारीचे स्वरूप.—** हे प्रकरण राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडून हस्तांतरित करण्यात आले होते. हे प्रकरण यु. टी. पी. चिंट्या वळवी ह्याचा कोठडीतील मृत्युशी निगडीत आहे. त्याला ठाणे जेलमधून येरवडा जेलमध्ये हलविण्यात आले होते.

**मा. आयोगाने केलेली कारवाई.—** सदरच्या प्रकरणात सुनावणीच्या वेळी प्रतिवादी हजर होते. मा. आयोगाला सदरच्या प्रकरणात दाखल झालेला कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर असे दिसून आले की, कैद्याने त्याला स्वतःच स्वतःला दोराच्या साहाय्याने फास लावून आत्महत्या केली होती. सर्व प्रकार करण्यासाठी आणि शेवटी आत्महत्या करण्यासाठी बराच वेळ लागला असला पाहिजे. त्याकडे कारागृहातील कोणत्याही कर्मचाऱ्याचे लक्ष न जाणे आश्चर्यकारक वाटते. तीच बाब कैद्याच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यात कारागृहातील अधिकाऱ्यांचा अक्षम्य कामचूकारपणा आणि निष्काळजीपणा दर्शवते.

**आयोगाचा निर्णय.—** आयोगाला असे वाटते की आणि त्याचे मृतावर अवलंबून असणारे नातेवाईक हे नुकसानभरपाई मिळण्यास पात्र आहेत कारण ही दुर्दैवी घटना पुणे येथील येरवडा तुरूंगातील कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे घडली आहे, आणि ती रोखण्यात ते अपयशी ठरले आहेत. मा. आयोगाने अशी शिफारस केली की, विभागीय सचिव, गृह विभागांनी यांचेकडे या केस मधील संबंधित कर्मचारी सदस्य ज्यांनी ही घटना रोख्यात कामचुकारपणा केला व जो निकाळजीपणा दाखविला त्यांच्याविरूद्ध विभागीय चौकशी करण्याचे निर्देश दिले आणि मृतांवर अवलंबून असणाऱ्या नातेवाईकांना नुकसान भरपाई म्हणून रुपये ५ लाख सुद्धा देण्यात यावेत.

**शासनाकडून करण्यात आलेल्या शिफारशीनुसार केलेली कारवाई.—** शिफारशीला अनुसरून गृह राज्याकडून दिनांक २ मे २०१३ रोजीचे आयोगाला पत्र मिळाले ज्यामध्ये अशी विनंती आयोगास करण्यात आली होती की, प्रतिवाद्याची सुनावनी न घेता रुपये ५ लाखाची भरपाई देण्याची शिफारस करण्यात आलेल्या आदेशावर पुर्नविचार करण्यात यावा.

सदर प्रकरण नवीन आयोगासमोर पुर्नविचार करण्यासाठी सादर करण्यात यावे असे ठरविण्यात आले.

(५) प्रकरण क्रमांक : ४१९७/२०१०-११

तक्रारदाराचे नांव : सारंगी महाजन.

प्रतिवादीचे नांव (१) जिल्हा तुरुंग अधीक्षक, नाशिक.

आदेश दिनांक : ८ डिसेंबर २०११.

गणसंख्या : न्यायमूर्ती क्षितिज आर व्यास, माननीय अध्यक्ष.

**तक्रारीचे स्वरुप.—** सदरच्या प्रकरणामध्ये तक्रारदाराने असा आरोप केला होता की तिच्या नवऱ्याला नाशिक कारागृहातील अधिकाऱ्यांनी योग्य औषधोपचार न दिल्यामुळे आणि त्यांच्या निष्काळजीपणामुळे तिच्या नवऱ्याचा मृत्यु झाला आहे तक्रारदाराने सदरच्या प्रकरणात तिच्या नवऱ्याच्या मृत्युची कारणाची योग्य ती चौकशी करावी ; आणि निष्काळजी व्यक्तीविरुद्ध योग्य ती कारवाई करावी.

**मा. आयोगाने केलेली कारवाई.—** सदरच्या प्रकरणात मा. आयोगाने नाशिक मध्यवर्ती कारागृहाच्या वैद्यकीय अधिकाऱ्याला समन्स पाठविले. मा. आयोगाने त्या संदर्भातील अभिलेखाची पाहणी केली असता असे निदर्शनास आले की, तक्रारदाराच्या नवऱ्याला नाशिक मध्यवर्ती कारागृहात गंभीरपणे औषधोपचार न करता नेहमीचाच औषधोपचार केला होता. सदरचे प्रकरण योग्य औषधोपचार न करण्याचे किंवा योग्य औषधोपचार करण्याचे होते.

**मा. आयोगाचा निर्णय.—** सदरच्या प्रकरणात मा. आयोगाने अशी शिफारस केली की, राज्य सरकारने संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्या विरुद्ध योग्य ती चौकशी सुरू करावी आणि त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी आणि त्याच बरोबर तक्रारदाराला तिने केलेल्या वैद्यकीय खर्चाबाबत ७ लाख रुपये किंवा तिने राज्य सरकारच्या संबंधित विभागाकडे दाखल केलेल्या बिलाची रक्कम जी कमी आहे ती प्रदान करण्यात यावी.

**शिफारशीवर सरकारने केलेली कारवाई.—** सदरच्या प्रकरणात राज्य सरकारने मा. आयोगाने वारंवार स्मरणपत्रे पाठवून सुद्धा कोणताही प्रतिसाद दिला नाही.

डी. के. बसू विरूद्ध प. बंगाल राज्य—

चांगल्या प्रशासनात मानवी हक्काबद्दलचा आदर असला पाहिजे. लोकशाही समाजात मानवी हक्कांचे संरक्षण आणि त्यांना प्रोत्साहन देणे ही जबाबदारी राज्याची आहे. सर्व राज्य सरकारच्या संस्था जरी पोलीस विभाग सैन्य, न्यायव्यवस्था किंवा नागरी प्रशासन या सर्वांची मानवी हक्कांची आदर करणे, मानवी हक्कांच्या उल्लंघनास प्रतिबंध करणे आणि त्यांचा विकास करण्यासाठी सकारात्मक पावले उचलणे हे त्यांचे कर्तव्य आहे.

पोलीस त्यांची कर्तव्ये करीत असताना त्यांची कृत्ये बऱ्याच वेळेला ते मानवी हक्कांच्या संबंधात येतात. पोलीस अधिकाऱ्यांना लवकर निकाल देण्यासाठी दबाव आणला जातो. बऱ्याच वेळेला अनधिकृतरित्या त्यांना अशी हमी दिली जाते की, काम पूर्ण करण्यासाठी शक्य त्या कोणत्याही मार्गाचा अवलंब ते करू शकतात. तथापि पोलिसांना कायदा संरक्षक म्हणून दोन्ही, कायदेशीर कर्तव्य आणि मानवी हक्काची दर्जा सांभाळण्याची नैतिक जबाबदारी आहे ; आणि आपल्या राज्य घटनेचा भावार्थ लक्षात घेवून कायद्यानुसार काटेकोरपणे कार्य करावे लागते.

कोठडीतील हिंसाचार ज्यात छळ, कोठडीतील मृत्यू हे कायद्याच्या राज्याला जोरदार फटका आहे. ज्यामुळे कार्यकारी यंत्रणांचे अधिकार केवळ कायद्यापासून प्राप्त केलेले नसावेत इतकेच नव्हे तर त्यांना कायद्यान्वये मर्यादा दिलेल्या असाव्यात. त्यामुळे कारवाईतील पारदर्शकता आणि जबाबदारी हे कदाचित दोन शक्य असलेले सुरक्षा उपाय आहेत. ज्यांच्यासाठी कोर्टाने आग्रह धरला पाहिजे. जितके जास्त कडक उपाय तितकी तिव्र पावले मानवी हक्कांचे उल्लंघन, प्रतिबंध आणि संरक्षणासाठी पोलीस यांनी आणि कारागृह अधिकाऱ्यांनी घेणे आवश्यक आहे.

त्यांनी सरकारच्या प्रतिनिधीनी त्यांच्यावर केलेल्या अवैध प्रवेशाबद्दल जोरदारपणे विरोध केलेला आहे.

पोलीस आणि कारागृह अधिकाऱ्याकडून मानव अधिकाराचा भंग टाळणे व ते सुरक्षीत ठेवण्यासाठी या क्षेत्रात जास्त कडक पावले उचलणे गरजेचे आहे.

तणावाचे वाढते प्रसंग व कस्टडीतील छळ यांच्या दृष्टीने डी. के. बसू, वि. प. बंगाल राज्य, एआयआर १९९७ एससी ६१० या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने ११ विशेष आवश्यकता आणि पद्धती सांगितल्या आहेत त्यामध्ये कोणत्याही व्यक्तीस अटक करतेवेळी, स्थानबद्ध करतेवेळी, चौकशी करतेवेळी, डांबतेवेळी पोलीस आणि इतर एजेन्सीजना ते पाळण्याचे निर्देश दिले आहेत. ती ११ मार्गदर्शक तत्त्वे आहेत-

सर्वोच्च न्यायालयाने इतक्या वर्षात मूलभूत अधिकारांची व्याप्ती समजावली व त्यांचे विश्लेषण केले आहे. (२) व्यक्तींचे अधिकार आणि मानसन्मान नेहमी सूरक्षित ठेवला पाहिजे असे ठासून सांगितले आहे. न्यायालयाने कायद्याची अंमलबजावणी लागू करण्यासाठी काही निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देश पोलीस स्टेशन मध्ये पोलीसांच्या विविध कामाशी सबंधीत आहेत जसे एखाद्या प्रकरणाचे नोंदणीकरण, तपासाची पद्धत, एखाद्या व्यक्तीला ताब्यात घेण्याची पद्धत, ताब्यात घेतलेल्या व्यक्तीशी व्यवहार, जामीन देणे, संशयीतास प्रश्न विचारणे आणि महिला, गरीब व ज्यांना फायदा मिळत नाही अशा लोकांचे अधिकारांचे संरक्षण करणे.

या आवश्यकता या इतर हक्क व नियमांव्यतिरिक्त आहेत, जसे :

- अटक करतेवेळी ज्या गुन्ह्यासाठी एखाद्या व्यक्तीला अटक केलेली आहे त्याची माहिती मिळणे हा त्याचा हक्क आहे.
- अटक झाल्यानंतर दंडाधिकाऱ्यासमोर २४ तासाच्या आत हजर करणे आवश्यक आहे हा त्याचा अधिकार आहे.
- ताब्यात घेतेवेळी किंवा ताब्यात असताना चुकीच्या पद्धतीने अधिकाराचा गैरवापर करू नये किंवा छळ करू नये.
- पोलीस कस्टडीतील कबुलीजबाबाचा वापर आरोपिताविरुद्ध पुरावा म्हणून वापरता येणार नाही.
- १५ वर्षांपेक्षा लहान असलेला मुलगा आणि महिलांना प्रश्न विचारण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये बोलविता येणार नाही.

भारतीय घटना, जी देशाचा मूलभूत कायदा आहे, ती पोलीस आणि इतर एजन्सीच्या वाईट वागणूक आणि छळापासून सर्व व्यक्तींना सुरक्षा प्रदान करते.

जीवन व वैयक्तीक स्वतंत्रता भारतीय घटनेच्या नियमावली अनुच्छेद २१ मध्ये प्रतिष्ठापित केलेली आहेत. मानवी मानसन्मानासहीत जीवन जगण्याचा अधिकार उपलब्ध करते आणि राज्य त्यांच्या आणि इतर संस्थाच्या छळाविरुद्ध हमी देते.

भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद नियमावली नं.२२ कैद्यांची बेकायदेशिर अटक आणि स्थानबद्धता याविरुद्ध संरक्षण देते आणि या तरतुदी प्रत्येकाचे स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि अन्यायग्रस्तांचे मूळ मानवी हक्क यांच्या संरक्षणाचा प्रयत्न करते.

विशाखा वि. राजस्थान राज्य, एआयआर १९९७ एससी ३०११

दुसरे क्षेत्र ज्यावर प्रकाश लक्ष केंद्रीत करण्याची आवश्यकता आहे ते हिंसाचार व महिलां विरुद्ध छळ. या घटनांचे प्रमाण दिवसें दिवस वाढत आहे म्हणून कारणे व उपायांचे विश्लेषण करण्यात यावे. कार्यकारी अधिकारी एका हाती महिलांना बलवान बनवण्याच्या मागे लागले आहेत परंतू त्याच वेळी महिलांविरुद्ध हिंसाचार घडत आहेत जसे बलात्कार, लहान मुलांच्या हत्या, बाल मजुरी, लैंगिक कामासाठी महिलांवर अनीतीचा व्यवहार, मुलांवर अनितीचा व्यवहार असे विविध अत्याचार महिलांविरुद्ध घडत आहे आणि ते कमी करण्यात ते असफल होत आहेत.

तेथे नेहमीच पुरुषांची चलती आहे आणि महिला अजूनही त्यांची कुवत असताना सुद्धा कामाच्या जागी त्यांना अन्याय सहन करावा लागत आहे, तेथे कामाच्या जागी लैंगिक शोषणाच्या विविध घटना, प्रसंग आहेत आणि इतर प्रकाशात आलेले नाहीत.

या विशेष न्यायाच्या दृष्टीने, सर्वोच्च न्यायालयाने कामाच्या जागी महिलांचे लैंगिक शोषण संबंधात मार्गदर्शक तत्त्वे बनविली आहेत आणि सदर मार्गदर्शक तत्त्वाना " देशाचा कायदा म्हणून जाहीर केले आहे ". महिला जास्त करून लैंगीक शोषणाच्या बळी ठरतात कारण त्यांच्यात शक्तीची कमतरता, त्या असुरक्षित वातावरणात असतात, आत्मविश्वासाची कमतरता किंवा शांततेत दू:ख भोगण्याची सामाजिक परिस्थिती सदर मा. सर्वोच्च न्यायालयाने महिलांची लैंगिक शोषण टाळण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे आणि पाळावयाचे नियम बनविले आहेत. त्या कामाच्या महिलांची लैगीक शौषण टाळण्यासाठी पाळाव्यात.

वरील न्यायनिर्णयामध्ये असे सांगीतले आहे की हे मालक किंवा कामाच्या ठिकाणावरील किंवा इतर संस्थातील इतर जबाबदार व्यक्तींचे कर्तव्य आहे की त्यांनी लैंगीक शोषणाच्या घटना प्रतिबंध करावा किंवा अशा लैंगिक शोषणच्या घटना घडूनयेत व त्यांची भिती वाटावी व त्यांचे निराकरण, तडजोड किंवा तक्रार दाखल करणे आणि यासाठी सर्व आवश्यक पावले उचलावीत.

या हेतूसाठी लैंगिक छळात बिनस्वागतार्ह लैंगितेचे ठरवलेले वर्तन जसे

अ. शारीरिक संबंध व मागे मागे जाणे

ब. लैंगीक सुखाची मागणी किंवा विनंती

क. लैंगीक संबंधी वाक्ये उच्चारणे

ड. अश्लिल वाचन किंवा चित्रफीत दाखविणे

ई. लैंगीक प्रकारचे इतर बिन स्वागतार्ह शारीरिक, तोंडाणे किंवा विनातोंडी वर्तन.

ओल्गा टेल्लीस आणि इतर वि. मुंबई महानगरपालीका आणि इतर (मनू/एससी/००३९/१९८५)

सदर प्रकरण जीवन जगण्याच्या अधिकारावर अवलंबून होते. रहिवाश्याना त्यांचे जीवन जगण्या पासून वंचित केल्यामुळे, सदर राज्य पुरेसे पर्यायी रहिवासी जागा उपलब्ध करण्यास बांधीत होते.

मानव अधिकाराचे उल्लंघन संबधीत सर्वोच्च न्यायालयाने असंख्य प्रकरणे हाताळली आहेत जी खालील प्रमाणे आहेत.

- जोगींदर कुमार वि. पंजाब राज्य या प्रकरणात बेकायदेशिर पकडण्याचा अधिकार सामील आहे.
- सुनिल बत्रा वि. पंजाब राज्य या प्रकरणात सर्वोच्च न्यायालायाने कारागृहातील छळा विरुद्ध अधिकार.
- हुस्सेनाना खातून वि बिहार राज्य या प्रकरणात वेगाने न्यायमिळविण्याचा अधिकार.
- फान्सीस कोरॅली वि. दिल्ली व्यवस्थापन या प्रकरणात कैद्याला वकीलाशी मुलाखत मिळण्याचा अधिकाराबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने विचार केला.

## प्रकरण ३

## मानव हक्क शिक्षण आणि जागरुकता

संयुक्त राष्ट्रांची सामान्य विधानसभा ने जाहिर केले आहे की मानवी हक्कांचा जागतीक जाहिरनामा मध्ये प्रतिष्ठापित केलेले अधिकार प्राप्त करण्यासाठी मानव अधिकार शिक्षण हे मध्य भागी आहे.

सामान्य सभा असे जाहिर करते की मानवी हक्काचा जागतिक जाहिरनामा हा सर्व माणसे आणि सर्व राष्ट्रे यांच्यासाठी आणि शेवटी प्रत्येक व्यक्ती समाजाचा प्रत्येक घटक यांनी सदर जाहिरनामा त्यांच्या मनात लक्षात ठेवून आणि प्रयत्नांची पराकाष्ठा करुन या हक्कांचा आणि स्वातंत्र्याचा आदर करण्याचे प्रोत्साहन द्यावे.

सदर आयोग मानव अधिकाराची वृद्धी, शिक्षण आणि जागरुकतेसाठी सतत काम करतो. सदर आयोग शैक्षणिक आणि प्रशिक्षण कार्यक्रम राबवतो म्हणजे,—

१. प्रशिक्षण कार्यक्रम.................वर्षातून एकदा राबवला जातो.

२. Attachment कार्यक्रम................ पूर्ण वर्षभर चालतो

सदर वर्षी तेथे इंटर्नशीप कार्यक्रमासाठी ४७ विद्यार्थी होते.

वरील गोष्टीशिवाय, सदर आयोग विविध महाविद्यालयांच्या भेटी स्विकारतो आणि आयोगाच्या विविध विभागांच्या कामाची, तक्रार स्वीकरण्याची प्रक्रिया, तक्रारींची छाननी त्याप्रमाणे प्रकरणांची विभागणी यांची थोडक्यात माहिती देतो.

वरील गोष्टी व्यतिरिक्त सदर आयोग ग्रामीणभागात, जिल्हाक्षेत्रात, छोट्यागावात, वगैरे मध्ये जागरुकता आणण्यासाठी विविध कार्यशाळा सुद्धा भरवतो. आयोगाकडे उपलब्ध असलेल्या साधनांच्या सहाय्याने लोकात जास्तीत जास्त जनजागृती करण्यासाठी सदर जागरुकता कार्यक्रम, पथनाट्य, तांत्रिक मदत घेऊन विविध कार्यक्रम घेतले जातात.

सदर आयोग प्रशिक्षणास सुद्धा प्रोत्साहन देतो आणि विविध विद्यार्थी ज्यांनी समाज सेवा करण्याचे व्यवसाय स्विकारले आहे अशाना मार्गदर्शन करतो. तो अशा विद्यार्थ्यांना विविध कार्य देतो आणि ठरलेल्या वेळेप्रमाणे अहवाल घेतो. सदर कार्यक्रम लवचीक असतात आणि प्रकल्प हाती घेण्यासाठी आयोग विद्यार्थ्यांना परवानगी देतो त्यावेळी सुद्धा ते अभ्यास करत असतात. हे विद्यार्थ्यांना सदर क्षेत्रात संपूर्ण विकास, सदर क्षेत्रात जागरुकता आणण्यास मदत करतो आणि त्यांच्या स्वभावात बदल करतो आणि शेवटी पुढे येणाऱ्या कठीण प्रसंगाना तोड देण्यास आत्मविश्वास निर्माण करतो.

सदर आयोग झोपडपट्टी क्षेत्रात जागरुकता आणण्यास विद्यार्थ्यांच्या मदतीने कार्य करतो. जेथे मानव अधिकाराची हिंसा जास्तीत जास्त आहे, कारण त्यांच्याकडे शिक्षण नसते व ते अशिक्षित असतात.

सदर आयोग विविध महाविद्यालयांना कार्यालयात आमंत्रीत करतो आणि त्यांना आयोगाचे कामकाज दाखवतो. जेथ जेथे आयोगाच्या अधिकाऱ्यांना शैक्षणिक संस्थामध्ये आणि इतर जागी अथिति व्याख्यान देण्यास आमंत्रित केले जाते तो ते स्विकारतो. विविध बिन-सरकारी कंपन्या द्वारे सदर आयोग जागरुकता आणतो आणि सदर कंपन्यानी आणलेल्या केसेस सुद्धा हाताळतो.

सदर आयोग कारागृह, रिमांड हाउस, महिला घरे, लहान मुलांची काळजी घेणारी घरे, बौद्धीक-आजारी घरे आणि म्हाताऱ्या माणसांसाठी घरे यामध्ये विविध मानव अधिकार जागरुकता कार्यक्रम सुद्धा राबवतो.

जागतीक मानव अधिकार दिवस साजरा

१०.१२.२०११ रोजी आयोगामध्ये जागतिक मानव अधिकार दिवस साजरा केला गेला. पोलीस जिमखाना, मुंबई येथे एक संमेलन ' विकास आणि शासन ' या विषयावर आयोजजित केले होते. माजी मा. अध्यक्ष आणि मा. सदस्य आयोगाच्या संमेलनास हजर राहिले.

तीन मुख्य सचिवांनी सरकारच्या बाजूने प्रदर्शन सादर केले. दुसऱ्या बाजूने विकास शास्त्रज्ञ आणि विकासाकडून अधिकारी, आर्थिक, समाजीक कार्य, सरकार आणि भ्रष्टाचार विरोधी आणि कायदेशिर सल्लागार यांनी त्यांचे वरील विषयावरील सादरीकरण केले.

त्यावेळी १३ उच्च पातळीचे वक्त्यांनी सदर विषयावर भाषणे केली आणि त्यांनी त्यांचे वरील विषयावरील सादरीकरणे केली :

१. श्री. सुधीर ठाकरे (आय. ए. एस.) सचिव, ग्रामीण विकास विभाग यांचे ‘ विकास व सरकार ’ या विषयावर प्रदर्शन.

२. श्री.एन.वाय.जंत्रेड आएएस सचिव, (ए.आर.एण्ड.ओ.एम.) यांचे ‘ महाराष्ट्रामधील व्यवस्थापकीय सुधारणा ’ या विषयावर प्रदर्शन.

३. डॉ. एस. चंद्रशेखर, इंदीरा गांधी इन्स्टीट्यूट ऑफ विकास संशोधन यांचे ‘ सार्वजनिक प्रणाली शासनातील परिवर्तन ’ या विषयावर प्रदर्शनश्री.

४. श्री. स्वतंत्र कुमार, मुख्य आयुक्त, आयकर यांचे ‘ आयकर विभागातील शासन व्यवस्था ’ या विषयावर सादरीकरण.

५. डॉ. एन. भास्करा राव, अध्यक्ष, सीएमएस, नवी दिल्ली यांचे ‘ चांगल्या शासन करण्यास मार्ग: भ्रष्टचाराच्या असंख्या धरणा ’यावर सादरीकरण.

६. श्री.एस.जे.कुंटे, मुख्य सचिव, योजना विभाग यांचे ‘ योजना प्रक्रिया ’ यावर प्रदर्शन.

७. प्रो. अरविंद तिवारी, डीन, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशिअल सायन्सेस यांचे ‘ मानवी अधिकारावर अवलंबून विकास मानवी अधिकार संस्थाची भूमिका ’ या विषयावर प्रदर्शन.

८. श्री. सतिश शहानी, डीजीपी (निवृत्त) यांचे ‘ सरकार व कायद्याचे राज्य नियम ’ यावर प्रदर्शन.

९. प्रो. रतुला कुंडू, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस यांचे ‘ महाराष्ट्रातील छोटया व मध्यम शहरातील शासन या मुद्यावर ’ यावर सादरीकरण.

१०. श्री.एस.चक्रवर्ती, (डीजीपी) निवृत्त यांचे ‘ चांगल्या सरकारसाठी नियंत्रणाची संस्थात्मक पद्धत ’.

११. अॅड.गायत्री सिंग यांचे ‘ मुलांचे कुपाषनाचा विषय ’ यावर प्रदर्शन.

१२. वरिष्ठ वकील श्री सुनिप सेन यांचे ‘ विकास व जमीन संपादनाचा विषय ’ यावर सादरीकरण.

१३. श्री. अनूज गोयल आय.सी.ए.आय, नवी दिल्ली यांचे ‘ भारतातील भ्रष्टाचाराचे प्रकरण आणि ते कमी करण्याचे उपाय या विषयावर सादरीकरण.

परिषदेच्या अनुषंगाने आयोगाने विविध सरकारी विभागातीलि विकास सूचक आणि देण्यात येणाऱ्या विविध सेवा तपासण्यासाठी एक प्रश्नावली तयार केली होती ती प्रश्नावली खालील चार मुद्यांवर तयार होती :—

अ. विकास कार्यक्रम, पैज लावणारा, लक्ष्य यावर सर्वसामान्य माहिती

ब. फायदा घेणाऱ्यांच्या निवडीची पद्धत

क. पैज लावणाऱ्यांना फायद्याची तबदिली

ड. देखरेख करण्याची व वर्गीकरणाची प्रक्रिया.

सदर प्रश्नावली मंत्रालयात सरकारच्या सर्व विभागात पाठवली होती.

**सेमिनार/संमलने**

मानवी अधिकाराचे संरक्षण कायदा, १९९३ चे कलम १२ (एच) प्रमाणे विविध साधने जसे प्रकाशन, वाहिनी आणि चर्चासत्र यांच्याद्वारे मानवी अधिकार जागरुकता करणे यावर प्रसार करण्यास सांगतो. राष्ट्रीय मानवी अधिकार आयोग, नवी दिल्ली सहीत महाराष्ट्र राज्य मानवी अधिकार आयोगाने दिनांक२३ व २४ फेब्रुवारी, २०१२ रोजी मुंबई येथे ‘ न्यूझीलॅण्ड हॉस्टेल, आरे कॉलनी, डेअरी विकास विभाग, महाराष्ट्र सरकार, गोरेगांव पूर्व, मुंबई ४०० ०६३ येथे एक सेमिनार आयोजित केला होता. यासाठी चार महिने अगोदर भाग घेणाऱ्यांना म्हणजे ठरविलेल्या महाविद्यालयांना एक प्रश्नावली आणि साहित्य उपलब्ध केली गेली होती जे मानवी अधिकार साक्षरता पसरवतात आणि मानवी अधिकार उल्लंघनाबाबतीचे त्यांचे अनुभव रेकॉर्ड केले होते. भाग घेणारे संपूर्ण महाराष्ट्रातून कायदा आणि सामाजिक कार्य महाविद्यालये होती. २२ महाविद्यालयांनी चर्चासत्रामध्ये भाग घेतला. तेथे एकूण १०९ जनांनी सहभाग घेतला. प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रदर्शन केले आणि त्यांच्या समोर आलेली वेगवेगळ्या प्रकारचे आलेले अनुभव सांगून सादरीकरण केले.

सदर सेमिनारचे उदघाटन महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची मा. अध्यक्ष व्यक्ती, न्यायाधीश क्षितीज आर. व्यास. श्री. मफीउल हुसेन, आयोगाचे सचिव यांनी स्वागताचे भाषण केले आणि सेमिनारचा विषय समजावून सांगितला. त्यानंतर श्री. आर. डी. शिरसाठ सहायक प्रबंधक यांनी काही प्रकरणांची माहिती दिली आणि श्री. जी. रवीशंकर, अधीक्षक यांनी एमएसएचआरसी कडून केस स्टडीज दाखवल्या. श्री.मफीउल हुसेन, सचिव यानी ‘ मानवी अधिकाराची ओळख ऐतिहासिक भाग आणि इतर संबंधित गोष्टी ’ आणि ‘ मानवी अधिकार म्हणून विकास व सरकार ’ अशी दोन सादरीकरण केली होती. श्री. श्रीधर एस.वगल, एमएसएचआरसीचे विशेष आयजीपी यांनी ‘ बंदीशाळेतील हिंसा व मानव अधिकार ’ सबंधात गोष्टीवर भाष्य केले होते. आयोगाची संशोधन अधिकारी डॉ. जयश्री पाटील यांनी भाग घेतलेल्या महाविद्यालयांना आयोगाच्या कामाची ओळख करुन दिली. त्यांनीसुद्धा सोनोग्राफी द्वारे मुलाचे लिंग निवडण्यासाठी आधुनिक पद्धतीवर विशेष जोर देऊन ‘ मुलगी व महिलांचे मानवी अधिकार ’ यावर भाष्य केले.

“ पश्चिम विभागासाठी युनायटेड नेशन्सचा संयुक्त राष्ट्राचा जागतिक नियतकालीक आढावा ” यावर एकदिवसीय संलग्न कार्यक्रम राष्ट्रीय मानवी हक्क आयोग यांनी आयोजित केला होता आणि राजस्थान एस.एच.आर.सी.ने जयपूरमध्ये दिनांक २६ जुलै २०११ रोजी आयोजित केले होता. श्री. मफीउल हुसेन, आयोगाचे सचिव यांनी सेमिनारमध्ये भाग घेतला होता.

दिनांक ३० सप्टेंबर २०११ राष्ट्रीय मानवी हक्क आयोगने ‘ वेढबिगार ’ यावर नवी दिल्ली येथे एक चर्चासत्र आयोजित केला होता. आयोगाच्या वतीने श्री.मफीउल हुसेन, सचिव यांनी भाग घेतला होता.

दिनांक ४ व ५ फेब्रुवारी २०१२ रोजी, टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशिअल सायन्सेसने नॅशनल हुमन राईटस कमीशन व इन्स्टीटयूट फॉर करेक्शनल ॲडमिनीस्ट्रेशन, चंदीगढ यांच्याशी मिळून ‘ बंदीशाळा व्यवस्थापनामध्ये मानव अधिकार ’ यावर एक चर्चासत्र आयोजित केले होते. मा.अध्यक्ष न्यायमुर्ती श्री. क्षितीज व्यास यांनी दिनांक ४ फेब्रुवारी २०१२ रोजी चर्चासत्र उद्घाटन केले होते. श्री. मफीउल हुसेन, आयोगाचे सचिव दिनांक ५ फेब्रुवारी २०१२ रोजी चर्चासत्राच्या समारोपाचे कार्यक्रमासाठी मुख्य पाहुणे होते.

**आयोगाचे संकेतस्थळ वेबसाईट.—** सप्टेंबर, २०११ मध्ये त्यांचे संकेतस्थळ पुन्हा लावून सदर आयोगाने मैलाचा दगड ठेवला आहे, संकेत स्थळ **www.mshrc.gov.in** आयोगाचे संकेतस्थळ लोकांमध्ये सुलभतेने पोहोचण्यात एक पाऊल पुढेच आहे. तो आल्यावर या संकेतस्थळाने लोकांकडून फारच मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळवला आहे. या संकेतस्थळावर आयोगाची विल्हेवाट प्रकरण आणि चालू असलेल्या प्रकरणासंबंधी माहिती लोड करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

## प्रकरण-४

## व्यवस्थापकीय आणि तर्कगणिती मदत

महाराष्ट्र सरकारने त्यांच्या जी.आर.नं.एचआरसी १०९९ / ३७८ / पोल १४, दिनांक १५ जानेवारी २००० द्वारा राज्य मानव अधिकार आयोग स्थापन केला. जेव्हा महाराष्ट्राच्या मा. राज्यपालांनी अध्यक्ष व्यक्ती व सभासदांच्या नेमणुकीचा आदेश काढला तेव्हा आयोग लागू झाला. त्याप्रमाणे अध्यक्ष व्यक्ती आणि सभासदांनी आयोगाच्या कार्यालयात पदभार घेतला.

**कर्मचारी.**—आयोगाचे कर्मचारी विविध विभागात नामे, व्यवस्थापकीय विभाग, अकाउन्टस विभाग, तपास विंग, कायदा विंग आणि संशोधन विभागात सतत वितरित करण्यात आले.

**जागा.**— महाराष्ट्र सरकारने त्यांच्या जी.आर.नं.एचआरसी-१०९९/ ३७८/पोल-१४, दिनांक १५ जानेवारी २००० मध्ये नमूद केले आहे की सदर महाराष्ट्र राज्य मानव अधिकार आयोगाचे मुख्य कार्यालय मुंबई येथे राहील. जीआर नं.जी.ए/११.०१/सी.एन.१५/२००१/२२ दिनांक २० जून २००२ प्रमाणे सरकारने आयोगासाठी २३८० चौ.फूट जागा वितरित केली आहे ती ॲडमिनीस्ट्रेटीव्ह स्टाफ कॉलेज बिल्डिंग चे कॅम्पस, ९, हझारीमल सोमानी मार्ग, सीएसटी, मुंबई ४०० ००१ येथे स्थित आहे. ही जागा पूर्वी स्टेट फायनान्स लि.च्या ताब्यात होती. सदर आयोग त्याच जागेत कार्य करत आहे.

**साधने.**—२०११-१२ या वर्षी राज्य सरकारने रु.२ कोटी ३४ लाख ४२ हजाराचा निधी उपलब्ध केला त्यासमोर एकूण खर्च २ कोटी ३४ लाख २२ हजार होता.

## जोडपत्र-अ

सर्वोच्च न्यायालयाने खालील ११ आवश्यकता ठरवल्या ज्या अटक किंवा बंदिस्त करण्याच्या सर्व प्रकरणात उपयोगात आणल्या पाहिजेत :—

१. अटक करणाऱ्या पोलीस व्यक्ती आणि अटक व्यक्तीचे परीप्रश्न हाताळत असेल तर सदर पोलीस कर्मचाऱ्याने अचूक, दिसण्याजोगे आणि स्पष्ट ओळखपत्र आणि नांवाचा बिल्ला त्यांच्या पदासह ठेवावे. असे सर्व पोलीस कर्मचारी जे अटक झालेल्या व्यक्तीचे प्रश्न ते रजीस्टर मध्ये रेकॉर्ड करावे.

२. सदर पोलीस अधिकारी अटक व्यक्तीची अटक हाताळत असेल तर त्याने अटकेच्या वेळी अटकेचा मेमो बनवावा आणि अशा मेमोवर कमीत कमी एका साक्षीदाराने साक्षांकित करावे, जो एकतर अटक व्यक्तीच्या कुटूंबातील सभासद किंवा स्थानिक प्रतिष्ठित व्यक्ती असू शकतो जेथून अटक केली आहे. त्यावर अटक व्यक्तीने काउंटर सही करावी आणि त्यात अटकेची वेळ आणि तारीख सामील असेल.

३. एखादा व्यक्ती ज्यास अटक केली आहे किंवा बंद केले आहे आणि त्याला पोलीस ठाण्यात कस्टडीत ठेवले जात आहे त्याला एक मित्र किंवा नातेवाईक किंवा त्याला माहित असलेला दुसरा व्यक्ती ठेवण्याचा हक्क राहील ज्यास त्याची काळजी घेण्यात रस असेल त्याने कळवावे की त्याला अटक झालेली आहे आणि एका विशेष जागी बंद केले जात आहे नाहीतर अटकेच्या मेमोचा साक्षांकन करणारा साक्षीदार जो तो स्वत: जसे एखादा मित्र किंवा अटक व्यक्तीचा नातेवाईक असेल.

४. अटक व्यक्तीच्या कस्टडीची वेळ, अटकेची जागा आणि कस्टडीची जागा पोलीसाने नोंद केलीच पाहिजे जेथे त्याचा जवळचा मित्र किंवा अटक व्यक्तीचा नातेवाईक जिल्हा किंवा शहराच्या बाहेर रहात असेल अटक केल्यानंतर ८ ते १२ तासात त्या व्यक्तीस टेलिग्राफने सदर पोलीस स्टेशनचे क्षेत्र कळवावे.

५. अटक केलेल्या व्यक्तीस ही माहिती द्यावी की त्याला त्याच्या अटक व बंदीबाबत एखद्याला कळविण्याचा हक्क राहील.

६. डायरी मध्ये सदर व्यक्तीच्या अटकेबाबत नोंद केलीच पाहिजे जी त्याच्या जवळचा मित्र ज्यास अटकेबाबत कळवले आहे त्याचे नांव दर्शवावे आणि ज्यांच्या ताब्यात सदर अटक व्यक्ती आहे त्या पोलीस अधिकाऱ्यांची नावे व माहिती लिहावी.

७. अटक व्यक्ती जेथे तो विनंती करीत आहे त्याला अटकेच्या वेळी तपासले पाहिजे आणि जर मोठी किंवा लहान जखम असल्यास त्यावेळी ती त्याच्या बेडवर रेकॉर्ड करावी. सदर निरीक्षण मेमो वर दोन्ही अटक व्यक्ती व पोलीस अधिकाऱ्याने सही करावी आणि त्याची प्रत अटक व्यक्तीस द्यावी.

८. संबंधित राज्य किंवा युनिअन टेरीटरीची आरोग्य सेवा, डायरेक्टरने नेमलेले संमत डॉक्टरांच्या पॅनेल मधून एका डॉक्टरने कस्टडीतील त्याच्या बंदीच्या अवधीत प्रत्येक ४८ तासात आणि एका प्रशिक्षित डॉक्टरने सदर अटी व्यक्तीची वैद्यकीय परीक्षा करावी. डायरेक्टर, आरोग्य सेवा याने असे एक पॅनेल सर्व तहसील व राज्यांना सुद्धा बनवावे.

९. वरील संदर्भीय अटकेचा मेमो सहीत सर्व कागदपत्रांच्या प्रती त्याच्या रेकॉर्डसाठी इलाका दंडाधिकाऱ्यास पाठवल्या पाहिजेत.

१०. जरी पूर्ण बंदिवासात नाहीत तरी बंदीच्या वेळी सदर अटक व्यक्तीला त्याच्या वकीलास भेटण्याची परवानगी दिली पाहिजे.

११. सर्व जिल्ह्यात आणि राज्य मुख्यालयात एक पोलीस नियंत्रण रुम उपलब्ध केला पाहिजे जेथून अटकेबाबत माहिती आणि अटक व्यक्तीच्या कस्टडीची जागा ज्या अधिकाऱ्याला अटक केली आहे यास अटकेच्या १२ तासात कळवता येईल आणि पोलीस नियंत्रण रुम मध्ये ती नोटीस बोर्डवर दर्शवली पाहिजे.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई